दिनांक 16/10/2023 (सोमवार) सकाळ

---

## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद
## स्थानिक गुन्हे शाखेची कार्यवाही

दिनांक १६/१०/२०२३ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पोलीस स्टेशन कन्हान परिसरात पेट्रोलिंग करीत असतांना मुखबिरव्दारे खबर मिळाली की, एक आयसर वाहन क्र. CG-08/Z-8752 या वाहनाने बेकायदेशीरपणे गोवंश यांना त्याची चारा पाण्याची सोय न करता गाडी मध्ये कोंबुन कत्तलीकरीता तारसा रोडने नागपूर रोडकडे जात आहे. अशा मिळालेल्या माहितीवरून पोलिस ठाणे कन्हान हद्दीतील तारसा रोडवर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने नाकाबंदी केली असता वाहनचालक याने नाकाबंदी पाहून सदर वाहन न थांबवता पळुन गेला. सदर वाहन चालकाचा पाठलाग केला असता वाहन चालक हा मिळून आला नाही. वाहनाची पाहणी केली असता त्यात एकुण २५ गोवंश किंमती ०२ लाख ५० हजार रू. चे जनावरे क्रुर व निर्दयतेने वाहतुक करतांना मिळुन आले. घटनास्थळावरून एकुण १) २५ गोवंश जनावरे किंमती ०२ लाख ५० हजार रू. व आयसर वाहन क्र. CG-08/Z-8752 किंमती १० लाख रूपये असा एकुण किंमती १२ लाख ५० हजार रूपयाचा मुददेमाल जप्त करण्यात आला आहे. गोवंश यांना चारापाण्याची सोय व्हावी करीता त्यांना खरबी भंडारा येथील गौशाळा येथे पाठविण्यात आले.

सदर प्रकरणी पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ११(१) (ड) प्राणि निर्दयतेने वागणुक प्रतिबंधक कायदा सहकलम ५(१) (अ) महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास कन्हान पोलीस करीत आहे.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. हर्ष ए. पोद्दार (भा.पो.से), अपर पोलीस अधीक्षक डॉ. श्री. संदिप पखाले यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, पोलीस उपनिरीक्षक बट्टुलाल पांडे, सहायक फौजदार नाना राऊत, पोलीस हवालदार विनोद काळे, ईकबाल शेख, प्रमोद भोयर, पोलीस नायक विरू नरड, संजय बरोदीया, चालक मोनू शुक्ला यांचे पथकाने पार पाडली.





पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर